राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद,जि.जालना आणि राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, जाफ्राबाद, ता.जाफ्राबाद,जि.जालना या प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१८-१९ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१९/प्र.क्र.११२/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: ३० जुलै, २०१९

वाचा :-

१.शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु- १११२/(२५८/२०१३)/प्राशि-३, दिनांक २/७/२०१३.

२.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१८/वर्गवाढ /ड-५१२/४६, दि.२/१/२०१९.

शासन निर्णय :-

राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद,जि.जालना आणि राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, जाफ्राबाद, ता.जाफ्राबाद,जि.जालना नमूद शाळांना इ.८वी चा वर्ग सन २०१८-१९ या वर्षापासून **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर** जोडण्यास खालील विवरणात दर्शविल्याप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेचे नांव | माध्यम | मागणी केलेला वर्ग | वर्षापासून |
|---|---|---|---|---|
| १ | राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद,जि.जालना | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१८-१९ |
| २ | राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, जाफ्राबाद, ता.जाफ्राबाद,जि.जालना | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१८-१९ |

२. वरील शाळेला सन २०१८-१९ या वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनूसार आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील,

२) शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,

३) सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री संबधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.र.परमार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

२. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
३. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, जालना.
७. निवडनस्ती एसएम-५.

HEAD MASTER
Rajmata Jijau English Schoc
Tembhurni, Tq. Jafrabad
Dist Jalna